# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामिण), नागपूर
# दिनांक १७/०२/२०२२ (गुरूवार)

## घरफोडी करणा—या आरोपीस अटक

**पोलीस स्टेशन पारशिवनी** — अंतर्गत कर्मचारी क्वॉर्टर अग्रवाल स्टील फॅक्ट्री नयाकुंड शिवार ६ किमी पुर्व. यातील आरोपी महीला नामे— सौ शिला दिनेश खुसराम वय २० वर्ष रा खुर्सापार हीने फिर्यादी राहत असलेल्या नयाकुंड शिवारातील अग्रवाल स्टील फॅक्ट्री चे क्वॉर्टर समोरील दाराचे कुलुप तोडुन रूममध्ये प्रवेश करून फिर्यादीचे सोन्याचे अंदाजे ७ ग्रॅम वजनी गळ्यातील एकदानी अंदाजे कि २५,०००/— रू २) सोन्याचे अंदाजे ५ ग्रॅम वजनी गळ्यातील जुने खिचडी पोत अंदाजे कि २०,०००/— रू ३) चांदीच्या दोन पायपट्टया कि ३,०००/—रू असा एकुन ४८,०००/— रू चे दागिने व नगदी २,०००/—रू असा एकुन ५०,०००/—रू चा माल दिनांक १३/२/२२ चे २०/०० वा ते १६/२/२२ चे ७/०० वा दरम्यान चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. प्रभा मनोहर जांभुळकर वय ६० वर्ष ह. मु अग्रवाल स्टील फॅक्टी नयाकुंड यांचे रिपोर्टवरून पोस्टे पारशिवनी येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील आरोपी महीला नामे—**सौ शिला दिनेश खुसराम वय २० वर्ष रा खुर्सापार** हीला अटक करण्यात आली असुन दिनांक १८/२/२२ पावेतो पी सी आर मध्ये आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री उबाळे सा पोस्टे पारशिवनी मो नं ७४९८१७९१७४ करीत आहेत.

## जनावर चोरी करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पोलीस स्टेशन मौदा** — अंतर्गत दिधोरी काळे १२ किमी पश्चिम. यातील फिर्यादी नामे— राजेद्र बबनराव काळे वय ४२ रा. दिधोरी काळे यांची जर्सी गाय तसेच एक गोरी व १ बैलजोडी असे नरेंद्र येळणे याच्या शेतात बाधुन ठेवली असता एकुण ९५,०००/— रू चे जनावरे दिनांक १६/२/२२ चे ०६/०० वा दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

तसेच मौजा झुल्लर रोड गुमथळा येथील फिर्यादी नामे—हंसाराम कृष्णराव डाफ वय ४२ रा. गुमथळा यांचे शेतात असलेल्या गोठ्यात बांधलेले पांढऱ्या रंगाची गाय कि. २०,०००/— व गोरा कि. २०,०००/— असा एकुण ४०,०००/—रू चे दिनांक १६/२/२२ चे १४/३३ वा. सदर जनावरे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अंतर्गत गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पो ना. देवेन्द्र भुरे मो.नं. ९५८८६७९८१४ हे करीत आहेत.

## मोटर सायकल चोरी

**पोलीस स्टेशन काटोल :—** अंतर्गत नगर परीषद काटोल २ किमी पश्चिम फिर्यादीची पल्सर मोटार सायकल क्रमांक एम.एच. ४० बी एच— ४७०५ कि. ४०,०००/— रू लाल काळ्या रंगाची ही नगर परीषद काटोल येथे हॅंडल लॉक करून उभी ठेवली असता, कोणीतरी अज्ञात चोराने दिनांक १५/२/२२ चे १५/०० वा ते १७/०० वा दरम्यान चोरून नेली.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शाहरूक राज रघडे वय २६ वर्ष रा अन्नाभाउ साठे नगर मटन मार्केट जवळ काटोल यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३७९ भादवि अन्वये गुन्हा नोंद केलेला असून पुढील तपास स फौ /जवाहर चव्हाण मो नं. ९०६७९६७१८१ हे करीत आहे.

## दागिने चोरी करणा—या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.

**पोलीस स्टेशन एम आय डि बोरी —** अंतर्गत वित्तुबाबा देवस्थान टाकळघाट ४ कि.मी.. दक्षिण. दिनांक १६/०२/२२ चे ११/०० वा. ते १३/०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी हि वित्तुबाबा देवस्थान टाकळघाट येथे दर्शनाकरीता गेली असता आरोपी नामे — अर्चणा धर्मा नांदे वय ४२ रा. सेलु जि.वर्धा हिने फिर्यादीचे गळ्यातील गोफ दाताने तोडत असता, फियादीला समजल्याने फिर्यादिने तिला पकडुन धरले व तिच्या ताब्यातील गोफ ताब्यात घेतला. परंतु फिर्यादीला माहित पडले कि, इतर चार बायांचे सोन्याचे वस्तु गोफ, व मंगळसुत्र, पदक, पोत हे वजनी ५ तोळा ७०० मि.ली. ग्रॅम असा एकुण १,४२,०००/— रू चा माल आरोपी व तिचे सोबतचे चोरट्यांनी चोरले.

सदर प्रकरणी फिर्यादी सौ. पुष्पा अशोक भांभरकर वय ५३ रा. पळसगाव ता. आरमोरी जि. गडचिरोली मो.क्र ७६२००९२५८६ यांचे रिपोर्टवरून पोस्टे एम आय डि सी बोरी येथे आरोपीविरूध्द कलम ३७९,३४ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला, सदर गुन्हयातील आरोपी नामे— **अर्चना धर्मा नांदे वय ४२ रा. सेलु जि.वर्धा** हीला दि. १६.०२.२२ रोजी अटक करण्यात आली असुन, सदर आरोपीचे ताब्यातुन एक तोळ्याची तुटलेली साधी पोत किंमत २६,०००/—रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदर महीला आरोपी दि १८.२.२२ पावेतो पीसीआर मध्ये आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय मो क्रं ९९२३४२४७६७ हे करीत आहेत.

## अपघातात मृत्यु

**पोलीस स्टेशन खापरखेडा :—** अंतर्गत मौजा वलनी ८ कि मी पश्चिम, फिर्यादी नामे— आरोपी मो सा क्र एम एच ४० बी ८३५६ चा चालक नामे चालक दिनबंधु कुंरील रा वलनी याने आपल्या ताब्यातील मोटर सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन आपल्या घरासमोर पायदळ फिरत असलेल्या फिर्यादीचे वडील नामे धीरालाल बिसेसर शाहु वय ७० वर्ष यांना जबर धडक मारून गंभीर जखमी केले. व जागेवरून पळुन गेला. उपचारादरम्यान धीरालाल शाहु यांचा मृत्यु झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— चेनत हिरालाल शाहु वय ३३ रा धनगवरी नगर, फ्लाट नं १४१ पारडी, नागपुर यांचे रिपोर्टवरून पो स्टे खापरखेडा येथे मोटर सायकल चालकाविरूध्द कलम २७९,३०४ (अ) भादवि सहकलम १८४ मोवाका अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मिश्रा पोस्टे खापरखेडा मो नं ९८११२९०८४९ करीत आहेत.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपुर**